# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**बुधवार, दिनांक ७ मार्च, २०१८/फाल्गुन १६, १९३९ (शके)**

**२३ . सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पीय प्रकाशनांचे सुटकेससह वितरण**

विधानपरिषदेच्या सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, सन २०१८-२०१९ ची अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेल्या सुटकेसची टोकन्स **मा.सदस्यांना शुक्रवार, दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी हजेरीपटावर स्वाक्षरी करतांना व तद्नंतर सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८ रोजीपासून सत्र संपेपर्यंत "ड-३" (अंदाज समिती) कक्ष, कक्ष क्र.१२०२, बारावा मजला, विधान भवन, मुंबई** येथे देण्यात येतील. मा.सदस्यांनी सदर टोकन्स खालील वितरण केंद्रावर जमा केल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस त्यांना वितरीत करण्यात येईल.

| अ.क. (१) | वार व दिनांक (२) | अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस वितरणाचा कालावधी (३) | ठिकाण (४) |
|---|---|---|---|
| १. | शुक्रवार, दिनांक ९ मार्च, २०१८ | अर्थसंकल्पावरील मा.वित्त मंत्री यांचे भाषण संपल्यानंतर | विधान भवनाच्या मागील प्रवेशद्वाराच्या बाजूला, विधान भवन, मुंबई. |
| २. | सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८ पासून सत्र संपेपर्यंत | सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.३० वाजेपर्यंत | कक्ष क्रमांक ११०४ (अ) (अकरावा मजला), विधान भवन, मुंबई. |

सर्व सन्मा.सदस्यांना कळविण्यांत येते की, अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेल्या सुटकेसेस त्यांनी कृपया लवकरात लवकर प्राप्त करुन घ्याव्यात.

मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांनी उपरोक्त टोकन्स तसेच अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली सुटकेस नेण्याची व्यवस्था करावी.

---

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ७ मार्च, २०१८

**डॉ.अनंत कळसे**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

**याची प्रत :**

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्मा.सदस्य ( मंत्री महोदयांसह )
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.